# औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस

| पोलीस अधिक्षक, कार्यालय | प्रेसनोट | दिनांक १२/०९/२०१७ |
| --- | --- | --- |

**प्रति,**

**सर्व सन्माननीय,**

डॉ.आरती सिंह,पोलीस अधीक्षक,औरंगबाद ग्रामीण,यांनी औरंगाबाद ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी,शाखा प्रभारी अधिकारी, यांची मासिक गुन्हे आढावा बैठक आज दि. १२/०९/२०१७ रोजी घेतली. सदर बैठकीमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे गुन्हयांचे तपासकामी उत्साह वाढवा या करिता उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व कर्मचारी यांना प्रशस्ती पत्र देवुन त्यांचा गौरव करण्यात आला.

यामध्ये पोलीस ठाणे करमाड येथील व्हॉटेल व्यावसायीक ज्योती नायर व पोलीस ठाणे शिल्लेगाव हद्दीतील वसुसायगाव येथील जनार्धन मानिक बारसे यांचे खुनातील आरोपीतांचा शोध घेवुन संवेदनशिल गुन्हा त्वरित उघडकिस आणुन आरोपीतांना तात्काळ अटक केल्या बद्दल स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री भुंजग, पोउपनि जाधव, दुलत, पोलीस कर्मचारी देशमुख, जोशी, शिराळे, गांगवे, तरमळे, लोखंडे, नदिम व शिल्लेगाव येथील सपोनि श्री खोपडे ,पोउपनि काळे, मुंढे,पोलीस कर्मचारी काळे,बिघोत,नरके .

तसेच पोलीस ठाणे एम.पैठण येथील पैशाचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवुन लोकांना फसवणा-या आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन १.५ कोटी रुपयाचे बनावट चलन जप्त केल्या बद्दल एम.पैठणचे सपोनि पायघन,पोना/११५०पवार,पोना/४५० पवार, मपोशि/देहाडराय यांचा आणि पोलीस स्टेशन पाचोड हद्दीतील अवैध रित्या चालवला जाणारा जनावरांचा कत्तलखाना उघडकीस आणुन कार्यवाही केल्याबद्दल परि.पोलीस उप अधिक्षक नयन आलुरकर व विशेष पथकाचे पोउपनि मनिषा लटपटे, पोह/मोरे,पोना/पवार,बोराडे, पोकॉ/मुसळे, ठोके तर सोयगाव (गलवाडा) येथील अपहरण झालेल्या मुलाचा तात्काळ शोध लावुन सदर मुलास सुरक्षित पणे त्यांचे आई वडिलांचे ताब्यात दिल्या बद्दल पो.स्टे. सोयगाव येथील प्रभारी अधिकारी श्री. सपोनि सुजित बढे, पोउपनि जागडे, पो.कर्म. पवार, गायकवाड, चव्हाण तसेच जिल्हयांतील वेगवेगळया पोलीस स्टेशनच्या गुन्हयात मा. सत्र न्यायालयात चालणारे खटल्यातील साक्षीदारांना योग्य मार्गदर्शन करुन गुन्हयांत शिक्षा मिळण्यासाठी प्रयत्न करणारे कोर्ट पैरवी अधिकारी पोउपनि सिद्दीकी,पैरवी कर्मचारी, जावळे, ढोले वाघ,जोनवाल,चाफे, इ.अधिकारी व कर्मचारी यांना मा.पोलीस अधीक्षक यांचे हस्ते प्रशंसापत्र देवुन गौरविण्यात आले.

वरील प्रमाणे उत्कृष्ट कामगिरी केलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव मा.डॉ. आरती सिंह, पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी अभिनंदन व प्रशस्ती पत्रक देवुन केला.सदरची बाब इतर अधिकारी व कर्मचारी यांना उत्कृष्ट कामगिरी करण्या करिता निश्चितच प्रोत्साहन व स्फूर्ती देईल.

**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करिता**

Scanned by CamScanner